राज्यातील कृषीपंप, यंत्रमाग व वस्त्रोद्योग ग्राहकांना वीज दरात सवलत दिल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना द्यावयाचे अर्थसहाय्य (रु.२०३१.१५ कोटी)(समायोजनाने) सन २०२३-२४ करीता वितरित करणेबाबत (लेखाशिर्ष-२८०१५५७२, २८०१५५८१ व २८०१५५९९)

**महाराष्ट्र शासन**
**ऊद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्र.पुरमा-२०२४/प्र.क.१०/ऊर्जा-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ३० मार्च, २०२४.

**संदर्भ** :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२३/प्र. क्र. ४०/अर्थ-३, दि.१२ एप्रिल, २०२३
२. महावितरण कंपनीचे पत्र क्र. पी-कॉम/शासन/मागणी/सवलत (GEN)/१०८७१, दि.२९.०४.२०२२.
३. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनि.विभाग, शासन निर्णय क्र.निधीवी-२०२३/प्र.क.४६/ऊर्जा-३, दि.६/१०/२०२३ व दि.२३/११/२०२३ व दि.०५/०३/२०२४.
४. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनि. विभाग, शासन निर्णय क्र.निधीवी-२०२४/प्र.क.०२/ऊर्जा-३, दि.२०.०२.२०२४
५. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र.पुरमा-२०२३/प्र.क.१०७/ऊर्जा-३, दि.२८/०३/२०२४.
६. महावितरण कंपनीचे पत्र क्र.मु. अ.(वा)/शासन/मागणी/सवलत(Gen)/००२१०३, दि.१९/०१/२०२४
७. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०४.०३.२०२४.

**प्रस्तावना** :-

राज्यातील विविध वर्गातील ग्राहकांना शासनाच्या धोरणानुसार विद्युत वितरण कंपनीला वीज दरात सवलत देण्यात येते व त्याची प्रतिपूर्ती शासनाकडून वितरण कंपनीस केली जाते. सदर योजनेंतर्गत (१) कृषिपंप ग्राहकांना वीज सवलतीसाठी सन २०२३-२४ करिता लेखाशिर्ष २८०१५५७२ खाली मूळ नियतव्यय रु.५१६७.६७ कोटी असून सुधारित अंदाजात रु.७३५५.९१ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी एकूण रु.५५७८.९१ कोटी महावितरण कंपनीस वितरित करण्यात आले आहेत.(२) यंत्रमाग ग्राहकांना वीज सवलतीसाठी सन २०२३-२४ करिता लेखाशिर्ष २८०१५५८१ खाली मूळ नियतव्यय रु.७००.०० कोटी असून सुधारित अंदाजात रु.१९८७.१८८० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी रु.१८०६.२६७७६१४ कोटी रक्कम महावितरण कंपनीस वितरित करण्यात आले आहेत. तसेच मे.अदानी इलेक्ट्रीसिटी कंपनी लिमिटेड, मुंबई यांचे वीज ग्राहक असलेले मे. लोटस इंडस्ट्रीज, सांताक्रुझ, मुंबई या यंत्रमाग ग्राहकास रु.०.१००२३८६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. (३) वस्त्रोद्योग ग्राहकांना वीज सवलतीसाठी सन २०२३-२४ करिता लेखाशिर्ष २८०१५५९९ खाली मूळ नियतव्यय रु.३००.०० कोटी असून सुधारित अंदाजात रु.७७६.०६७९ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी रु.७०२.७३७९ कोटी निधी महावितरण कंपनीस वितरित करण्यात आला आहे.

२. सन २०२३-२४ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र दि. २६.०२.२०२४ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले. सदर पुरवणी खर्चास आता विधानसभेने मान्यता दिली आहे. दि.३१.०३.२०२४ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षाच्या विनियोजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी पुरवणी विनियोजन विधेयकास मा. राज्यपालांनी संमती दिली असून ते महाराष्ट्र पुरवणी विनियोजन अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१७) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४, दि.२९.०२.२०२४ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

३. यास अनुसरुन पुरवणी मागणीन्वये व सुधारित अंदाजान्वये मंजूर निधीपैकी कृषीपंप, यंत्रमाग व वस्त्रोद्योग ग्राहकांना वीज सवलतीसाठी अनुक्रमे रु.१७७७.०० कोटी, रु.१८०.८२ कोटी व रु.७३.३३ कोटी रक्कम समायोजनाने महावितरण कंपनीला वितरीत करण्यास वित्त विभागाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार एकूण रु.२०३१.१५ कोटी रक्कम समायोजनाने महावितरण कंपनीला वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

कृषिपंप ग्राहकांना वीज दरात दिलेल्या सवलतीसाठी सन २०२३-२४ करिता अर्थसंकल्पित केलेल्या रु.७३५५.९१ कोटी रक्कमेपैकी रु.१७७७.०० कोटी (रुपये सतराशे सत्त्याहत्तर कोटी फक्त) रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना समायोजनाने वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. उक्त प्रयोजनासाठी होणारा "मागणीक्रमांक के-६, २८०१ वीज, ०५ पारेषण व वितरण, १०४, वीज विकास व्यवस्था राष्ट्रीय भार, (०१) वीज दरात सवलत, (०१) (०१) कृषीपंप ग्राहकांना वीजदर सवलत (सर्वसाधारण) (२८०१५५७२), (कार्यक्रम) ३३ अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

२. यंत्रमाग ग्राहकांना वीज दरात दिलेल्या सवलतीसाठी सन २०२३-२४ करिता अर्थसंकल्पित केलेली रु.१९८७.१८८० कोटी रकमेपैकी रु.१८०.८२ कोटी (रुपये एकशे ऐंशी कोटी ब्याऐंशी लाख फक्त) रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना समायोजनाने वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. उक्त प्रयोजनासाठी होणारा "मागणीक्रमांक के-६, २८०१ वीज, ०५ पारेषण व वितरण, १०४, वीज विकास व्यवस्था राष्ट्रीय भार, (०१) वीज दरात सवलत, (०१) (०२) यंत्रमाग ग्राहकांना वीजदर सवलत (सर्वसाधारण) (२८०१५५८१), (कार्यक्रम) ३३ अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. वस्त्रोद्योग ग्राहकांना वीज दरात दिलेल्या सवलतीसाठी सन २०२३-२४ करिता अर्थसंकल्पित केलेली रु.७७६.०६७९ कोटी रकमेपैकी रु.७३.३३ कोटी (रुपये त्र्याहत्तर कोटी तेहेतीस लाख फक्त) रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना समायोजनाने वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. उक्त प्रयोजनासाठी होणारा "मागणीक्रमांक के-६, २८०१ वीज, ०५ पारेषण व वितरण, १०४, वीज विकास व्यवस्था राष्ट्रीय भार, (०१) वीज दरात सवलत, (०१) (०३) वस्त्रोद्योग ग्राहकांना

वीजदर सवलत (सर्वसाधारण) (२८०१५५९९), (कार्यक्रम) ३३ अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. यानुसार समायोजनाने वितरीत करावयाची एकूण रक्कम रु.२०३१.१५ कोटी (रुपये दोन हजार एकतीस कोटी पंधरा लाख फक्त) महावितरण कंपनीस रोख न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महावितरण कंपनी मर्या., यांच्याकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेपोटी वसूल करण्यात यावी व खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली समायोजनाव्दारे जमा करण्यात यावी.

| क्र. | तपशील | रक्कम रुपये | जमा लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| | **लेखाशिर्ष- २८०१५५७२** | | |
| १) | वित्तीय वर्ष २०२३-२४ या वर्षातील विद्युत शुल्कापोटी या आदेशान्वये समायोजित करावयाची रक्कम (अंदाजित ऑक्टोबर, २०२३ ते डिसेंबर, २०२३) (२३३८,१४,४१,००० - १७७७,००,००,००० = रु.५६१,१४,४१,००० बाकी) | **१७७७,००,००,०००/-** | ००0४३ वीजेवरील कर व शुल्क १०१ वीजेचा वापर व विक्रीय यावरील कर (०१) (०१) मुंबई विद्युत शुल्क अधिनियम १९५८ खालील जमा रक्कमा (००४३००९२) |
| | **लेखाशिर्ष- २८०१५५८१** | | |
| २) | वित्तीय वर्ष २०२३-२४ या वर्षातील विद्युत शुल्कापोटी या आदेशान्वये समायोजित करावयाची रक्कम (अंदाजित ऑक्टोबर, २०२३ ते डिसेंबर, २०२३) (५६१,१४,४१,००० - १८०,८२,००,००० = रु.३८०,३२,४१,००० बाकी) | **१८०,८२,००,०००/-** | ००0४३ वीजेवरील कर व शुल्क १०१ वीजेचा वापर व विक्रीय यावरील कर (०१) (०१) मुंबई विद्युत शुल्क अधिनियम १९५८ खालील जमा रक्कमा (००४३००९२) |
| | **लेखाशिर्ष- २८०१५५९९** | | |
| ३) | वित्तीय वर्ष २०२३-२४ या वर्षातील विद्युत शुल्कापोटी या आदेशान्वये समायोजित करावयाची रक्कम (अंदाजित ऑक्टोबर, २०२३ ते डिसेंबर, २०२३) (३८०,३२,४१,००० - ७३,३३,००,००० = रु.३०६,९९,४१,००० बाकी) | **७३,३३,००,०००/-** | ००0४३ वीजेवरील कर व शुल्क १०१ वीजेचा वापर व विक्रीय यावरील कर (०१) (०१) मुंबई विद्युत शुल्क अधिनियम १९५८ खालील जमा रक्कमा (००४३००९२) |
| **एकूण (२८०१५५७२ + २८०१५५८१ + २८०१५५९९)** | | **२०३१,१५,००,०००/-** | |

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर यांनी त्यांच्या अखत्यारित व अधिकारात वरील विवरणपत्रानुसार सदर रक्कम रु. २०३१,१५,००,००० /- (रुपये दोन हजार एकतीस कोटी पंधरा लाख फक्त) चे पुस्तकी समायोजन करुन तसे शासनास कळवावे. सदर रक्कमेचे पुस्तकी समायोजन महालेखापाल, मुंबई यांच्या अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने सदर रकमेचे देयक तयार करण्यात येवू नये.

६. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.०४.२०२३ च्या परिपत्रकातील सोबतच्या परिशिष्टातील अनु.क्र.९ मधील अटींची पूर्तता होत आहे. तसेच अनु.क्र.१ ते ८ मधील अटी लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

७. या लेखाशिर्षाखाली निधी वितरित करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की,सदर देयक हे सशर्त असून या लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या प्राप्त मान्यतेनुसार सदर निधी समायोजनाने वितरित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२४०३३०१७२१५८१०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN
SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2024.03.30 17:31:26 +05'30'

**( ना. श्री. कराड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उपमुख्यमंत्री (ऊर्जा) ,यांचे सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
७) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
९) अपर मुख्य सचिव (ऊर्जा) मंत्रालय, मुंबई-३२.
१०) प्रधान सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१२) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.
१३) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, ३ रा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर मुंबई
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१५) महालेखापाल (लेखा व परिक्षा),महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१७) अधिदान व लेखा अधिकारी (अराप/रालेवि-१), मुंबई.
१८) अधिदान व लेखा अधिकारी,अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१९) उप सचिव,(अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२०) निवड नस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.